आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२४ एप्रिल २०२४ - बुधवार

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीचा प्रचार आज संपेल. या टप्प्यात राज्यातल्या ८ जागांसह देशातल्या एकूण ८९ जागांवर शुक्रवारी मतदान होणार आहे. या टप्प्यात राज्यातल्या बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड आणि परभणी या लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे.

विद्यमान खासदार प्रतापराव जाधव, नवनीत राणा, रामदास तडस, प्रतापराव पाटील-चिखलीकर, संजय जाधव यांच्यासह प्रकाश आंबेडकर, महादेव जानकर असे अनेक महत्त्वाचे उमेदवार या मतदारसंघातून निवडणूक रिंगणात आहे.

**<><><><><>**

हिंगोली जिल्ह्याच्या विकासासाठी महायुतीचे उमेदवार बाबूराव कदम कोहळीकर यांना प्रचंड मतांनी विजयी करावं, असं आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं आहे. वसमत इथं आज झालेल्या प्रचार सभेत ते बोलत होते. आपलं सरकार चोवीस तास कार्यरत असून त्यांच्यासह उपमुखमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिवस रात्र काम करत असल्याचं, शिंदे यावेळी म्हणाले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना बाबुराव कदम यांनाच मतदान करण्याचे आवाहन भ्रमणध्वनी द्वारे केलं आहे.

**<><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण सांगली लोकसभा मतदार संघाचा आढावा

घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

<><><><><>

डेहराडून इथल्या वन संशोधन संस्थेच्या भारतीय वन सेवेच्या प्रशिक्षणार्थींच्या पदवीदान समारंभाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज संबोधित केलं. मनुष्य, जंगलांचं महत्व विसरत आहे. हवामान बदलाच्या आजच्या परिस्थितीत जंगलांचं महत्व अधिक आहे यावर त्यांनी भर दिला. ही जंगलं वाचवणं आणि त्यांचं संवर्धन करणं ही जबाबदारी या अधिकाऱ्यांच्या खांद्यावर असल्याचं, त्या म्हणाल्या.

<><><><><>

पत्रा चाळ पुनर्विकास प्रकरणी प्रवीण राऊत आणि त्यांच्या निकटवर्तीयांची पालघर, दापोली, रायगड, ठाणे परिसरातली ७३ कोटी ६२ लाख रुपयांची स्थावर मालमत्ता सक्तवसुली संचालनालयानं आज जप्त केली आहे.

<><><><><>

भारतीय वायुसेनेचे प्रमुख ‘व्ही आर चा◌ैधरी’ यांनी आज ओझरच्या हवाईदल डेपोला भेट दिली. या डेपोला राष्ट्रपती कलर्स सन्मान मिळाल्याबद्द्ल चौधरी यांनी यावेळी कौतुक केलं. ओझर हवाई डेपोचा इतिहास दर्शवणारं प्रदर्शनही त्यांनी यावेळी पाहिलं.

<><><><><>

मुंबईत जव्हेरी बाजार परिसरातून महसूल गुप्तचर संचालनालयानं नऊ किलोग्रॅम सोनं आणि १६ किलोग्रॅम चांदी हस्तगत केली. आफ्रिकेतून अवैध मार्गानं आणलेलं

हे सोनं आणि चांदी वितळवण्यासाठी आली होती. या प्रकरणी ४ जणांना ताब्यात घेतलं आहे.

**<><><><><>**

नाशिक जिल्ह्यातल्या धार्मिक स्थळी अन्न पदार्थ विकणाऱ्यांवर  अन्न आणि औषध प्रशासनानं कारवाई केली आहे. देवीच्या साडे तीन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या वणी इथल्या  सप्तश्रृंग गडावर, पेढ्यांच्या नावाखाली हलवा विक्री होत असल्याचं लक्षात आल्यानंतर पाच दुकानांवर कारवाई करण्यात आली. या विक्रेत्यांकडची सुमारे सहा लाख रुपये किमतीची दोन हजार किलो भेसळयुक्त मिठाई नष्ट करण्यात आली.

**<><><><><>**

उत्तर कोकणातल्या तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याचा अंदाज आहे. तर कोकणातल्या तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट हवामान राहील, असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातल्या काही जिल्ह्यांमध्ये मेघ गर्जनेसह हलका पाऊस पडेल. तर विदर्भात काही  ठिकाणी विजांच्या कडकडाटासह गारपीट आणि सोसाट्याचा वारा वाहील, आणि हलका पाऊस पडेल, असा अंदाज कुलाबा वेधशाळेनं व्यक्त केला आहे.

**//<><><><><>//**